# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२- २९४५१००१

**Email ID- pro.cp.mbvv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक ३५६** **दिनांक २३-१२-२०२१**

## पत्नी व मुलीवर प्राणघतक हल्ला करुन २६ महिन्यांपासुन फरार असलेल्या आरोपीतास नालासोपारा पोलीस ठाणेचे पोलीसांनी केले जेरबंद.

दिनांक १०/१०/२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. चे सुमारास तक्रारदार कुमारी रुपा अशोक यादव यांचे राहते घरी डी/२०३ हिमालया बिल्डींग, नालासोपारा (प), ता. वसई जि. पालघर येथे तिचे सावत्र वडील नामे अशोक पतीराम यादव याने तक्रारदार यांचे घरी येवुन खर्चासाठी पैशांची मागणी करून त्यांचे सोबत राहण्याबाबत विचारणा केली होती. त्यास तक्रारदार रुपा यादव व तिची आई निलू यादव यांनी नकार दिल्याने अशोक यादव यास राग आला व त्याने निलू यादव यांना शिवीगाळ करुन त्याचे जवळील धारदार चाकुने तीचे पोटावर, काखेत व डावे हाताचे पंजावर वार करुन गंभीर जखमी केले होते. त्यावेळी फिर्यादी रुपा यादव हया भांडण सोडविण्यासाठी आली असतांना आरोपीत अशोक यादव याने फिर्यादी हिचे पोटावर चाकुने वार करुन तिला देखील गंभीर दुखापत करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. सदर घटनेबाबत नालासोपारा पोलीस ठाणे येथे । गु.र.नं. ३४८/२०१९ भा.दं.वि.सं. कलम ३०७, ५०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपीत नामे अशोक पतीराम यादव, वय ६० वर्षे, रा. संकेश्वर नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर हा गुन्हा दाखल झालेपासून फरार झालेला होता.

त्यामुळे सदर आरोपीताचा शोध घेवुन त्यास अटक करणेबाबत वरिष्ठांनी आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे नालासोपारा पोलीस ठाणेचे श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांनी तपास पथक तयार करुन आरोपीताचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या बातमीनुसार व तांत्रिक तपास करुन पाहिजे आरोपी अशोक पतीराम यादव, वय ६० वर्षे, रा. संकेश्वर नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर यास मालाड परिसरातून दिनांक २२/१२/२०२१ रोजी ताब्यात घेवून नमुद गुन्हयात अटक केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक किशोर माने हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली नालासोपारा पोलीस ठाण्याचे वपोनि श्री. विलास सुपे, पोनि. राहुल सोनावणे, सपोनि. अमोल तळेकर, सपोनि. पंडीत मस्के, परि.पो.उपनिरी. सलीम शेख, पोना. किशोर धनु, आदीनाथ कदम, सचिन कांबळे, पोशि सचिन मोहीते, हरेश काळे, राजेश नाटुळकर, नामदेव ढोणे यांनी केलेली आहे.

--------0000--------